महासागर
बुधवार दि.१७ मे २०२३
वाशिम
पान ३

## अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त पिडीत महिलांसाठी स्त्री शक्ती समाधान शिबीर

**वाशीम/प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त ३१ मे पूर्वी समस्याग्रस्त व पिडीत महिलांचे विविध विभागाशी संबंधित असलेले प्रश्न एकाच व्यासपिठावरुन सोडविण्यासाठी तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली गटविकास अधिकारी यांच्या सहकार्याने संबंधित तालुक्यात बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्यास्तरावर पिडीत महिलांसाठी स्त्री शक्ती समाधान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. वाशिम तालुका - १७ मे, मालेगांव तालुका - १८ मे, रिसोड तालुका - १९ मे, मानोरा तालुका - २२ मे, मंगरुळपीर तालुका - २३ मे व कारंजा तालुका २४ मे रोजी या शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे.

तरी समस्याग्रस्त पिडीत महिलांनी आपल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आपआपल्या तालुक्यातील बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याशी संपर्क साधून आपल्या अडचणी शिबीराच्या किमान एक दिवस आधी त्यांच्या समोर मांडाव्यात. म्हणजेच या दिवशी संबंधित महिलांच्या समस्यांचे निराकरण करणे सोयीचे होईल. असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, वाशिम यांनी कळविले आहे.

## ग्रामपंचायत पोटनिवडणूक तीन दिवस प्रतिबंधात्मक आदेश

**वाशीम/प्रतिनिधी**

ग्रामपंचायत पोटनिवडणूकी दरम्यान मतदान व मतमोजणीच्या दिवशी नागरीक राजकीय कारणावरुन विनाकरण भांडण तंटे करतात. त्याचे रुपांतर मोठया भांडणात किंवा घटनेत होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असते.

या सर्व बाबींना प्रतिबंध घालण्यासाठी व निवडणूक प्रक्रियेदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्याच्या उद्देशाने निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोणातून निवडणूकी दरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्याकरीता संबंधित मतदान केंद्र परीसरात १७ मे २०२३ रोजीच्या सकाळी ६ ते १८ मे २०२३ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत आणि मतमोजणीच्या दिवशी १९ मे २०२३ रोजी मतमोजणीच्या ठिकाणी मतमोजणी प्रक्रीया सुरु झाल्यापासून ते मतमोजणीची संपूर्ण प्रक्रीया संपेपर्यंत फौजदारी दंड संहिता १९७३ चे कलम १४४ जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी षण्मुगराजन एस. यांनी लागू केले आहे.

हा आदेश लागू केल्यामुळे पुढील बाबींना मनाई करण्यात आली आहे. धार्मिक स्थळांचा निवडणूकीसाठी उपयोग करण्यात येऊ नये. आचार संहितेच्या संपूर्ण काळात सार्वजनिक ठिकाणी शस्त्र जवळ बाळगता येणार नाही. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या ठिकाणी १०० मिटर परिसरात निवडणूकीच्या कामाव्यतिरिक्त कोणताही व्यक्ती प्रवेश करणार नाही. मतमोजणीच्या ठिकाणी १०० मिटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू राहील. असेही या आदेशात नमुद करण्यात आले आहे.

## आला उन्हाळा आरोग्य सांभाळा उष्मालाटेपासून बचावासाठी घ्यावयाची दक्षता

**वाशीम/प्रतिनिधी**

मे २०२३ पासून ते जुन २०२३ पर्यंत तापमानात वाढ होण्याची शक्यता वेधशाळेने वर्तविली आहे. उष्माघातामुळे होणारे मृत्यु टाळण्याकरीता व उष्माघात होऊ नये याकरीता करावे व काय करु नये. याबाबतची जनजागृती प्रत्येक गावामध्ये स्थानिक वैद्यकीय अधिकारी व सामुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा कार्यकर्ती यांच्यामार्फत आरोग्य शिक्षण देऊन स्थानिक लोकांचा सहभाग घेऊन आरोग्य शिक्षणाव्दारे जनजागृती करण्यात येत आहे.

प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर उष्माघात वातानुकुलीत कक्ष स्थापन करुन त्यामध्ये २ बेड, कुलर, पंखा तसेच लागणारा औषधीसह अद्यावत ठेवण्यात आलेला आहे, सतत तापमानात होणाऱ्या वाढीमूळे उष्माघात लागण व मृत्युची संख्या वाढण्याची शक्यता लक्षात घेता. उष्माघाताबाबत घ्यावयाची खबरदारी व उष्माघातापासून होणारे संभाव्य मृत्यु कसे टाळता येतील याबाबत व उष्माघाताची चिन्हे, लक्षणे तसेच त्यावर करावयाच्या उपाययोजनेबाबत जनतेस सविस्तर मार्गदर्शन आरोग्य शिक्षण प्रचार व प्रसिध्दी (आयईसी) प्रत्येक घरातील कुटूंबातील व्यक्तींना प्रत्यक्ष भेट देऊन प्रचार व प्रसिध्दी साहित्य वाचून दाखवून उष्माघात होऊ नये याबाबत घ्यावयाची खबरदारी व आरोग्य शिक्षण देण्यात येत आहे. उन्हाळयामध्ये नागरीकांनी उष्मालाटेपासून बचाव होण्याच्या दृष्टीने घ्यावयाची दक्षता पुढीलप्रमाणे आहे. पूरेसे पाणी प्यावे. तहान लागली नसली तरीही दर अर्ध्यातासाच्या अंतराने पाणी प्यावे. घराबाहेर पडतांना डोके झाकण्यासाठी छत्री अथवा टोपी व पांढरा शेला/दुपट्टयाचा वापर करावा. सुर्य प्रकाशापासून वाचण्यासाठी घरातील पड़दे आणि झडपांचा वापर करावा. उष्णतेच्या लाटेची माहिती जाणून घेण्यासाठी रेडीओ, टिव्ही किंवा वर्तमानपत्राचा वापर करण्यात यावा. हलके पातळ व सच्छिद्र सूती कपडे वापरावेत. प्रवासात व कामाच्या ठिकाणी मुबलक थंड पिण्याचे पाणी सोबत ठेवावे व जवळच व्यवस्था करावी. ऊन्हात काम करणे टाळावे. टोपी, शेला, छत्री किंवा ओल्या कपडयाने डोके, मान व चेहरा झाकावा. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओआरएस घरगुती उपाय लिंबुपाणी, ताक, लस्सी प्यावे. अशक्तपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम ईत्यादी उन्हाचा चटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

गुरांना छावणीत ठेवण्यात यावे, तसेच त्यांना पूरेसे पाणी पिण्यास दयावे. घर थंड ठेवण्यासाठी पडदे शटर व सनसेडचा वापर करावा. रात्री खिडक्या उघडया ठेवाव्यात. घरामध्ये कुलर व पंख्यांचा वापर करावा. सुर्य प्रकाशाचा थेट संबंध टाळण्यासाठी कारखाना व उद्योगात काम करणाऱ्या कामगारांना सूचना दयाव्यात. गरोदर स्त्रिया व आजारी कामगार यांची अधिक काळजी घ्यावी. पहाटेच्या वेळी जास्त कामाचा निपटारा करण्यात यावा. उन्हाळयामध्ये नागरीकांनी उष्मालाटेपासुन बचाव होण्याच्या दृष्टीने काय करू नये याबाबत पुढीलप्रमाणे दक्षता घ्यावी. दुपारी १२ ते ३ वाजेदरम्यान घराबाहेर पडू नये. शक्यतो बाहेर जाणे टाळावे. दारु, चहा, कॉफी आणि कार्बोनेट थंड पेय पिऊ नये. ऊन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करणे टाळावे. स्वयंपाक घराच्या दारे खिडक्या उघडया ठेवाव्यात. लहान मुले अथवा पाळीव प्राणी यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये. उच्च प्रथिनयूक्त व शिळे अन्न खाणे टाळावे. गडद घट्ट व जाड कपडे अंगात घालणे टाळावे. बाहेर तापमान जास्त असल्यास किंवा ऊन्हात कष्टाची शारीरिक श्रमाची काम करणे टाळावे. अशाप्रकारे उन्हाळयामध्ये नागरीकांनी उष्मालाटेपासुन बचाव होण्याच्या दृष्टीने काळजी घ्यावी. असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## जत्रा शासकीय योजनांची यंत्रणांनी लाभार्थ्यांना लाभ देण्याचे सुक्ष्म नियोजन करावे -षण्मुगराजन एस.

**वाशीम/प्रतिनिधी**

शासनाच्या अनेक लोककल्याणकारी योजना आहेत. हया योजना विविध विभागामार्फत राबविण्यात येतात. शासकीय योजनांच्या लाभापासून कोणताही पात्र लाभार्थी वंचित राहू नये. यासाठी जत्रा शासकीय योजनांची या उपक्रमातून यंत्रणांनी लाभार्थ्यांना लाभ देण्याचे सुक्ष्म नियोजन करावे. असे निर्देश जिल्हाधिकारी षण्मुगराजन एस. यांनी दिले.

आज जिल्हाधिकारी कार्यालयातील वाकाटक सभागृहात ' जत्रा शासकीय योजनांची ' या उपक्रमाच्या अनुषंगाने आयोजित सभेत श्री. षण्मुगराजन बोलत होते. सभेला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वसुमना पंत यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री. षण्मुगराजन बोलतांना पुढे म्हणाले, सर्व यंत्रणांना त्यांच्या विभागामार्फत ज्या योजना राबविण्यात येतात, त्या योजनांचा लाभार्थ्यांना लाभ देण्याचे नियोजन करतांना लाभार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन घ्यावी. ही पुर्तता करतांना लाभार्थ्यांना सहकार्य करावे. प्रत्येक यंत्रणेला लाभार्थ्यांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यंत्रणांकडे काही नव्याने योजना असतील तर त्या योजनेचा लाभार्थ्यांना लाभ देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात येईल. यंत्रणांनी लाभार्थी उद्दिष्टांची माहिती त्वरीत सादर करावी. जिल्हयाच्या ठिकाणी एका निश्चित तारखेला ७५ हजार लाभार्थ्यांना एका छताखाली लाभ देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री हे उपस्थित राहणार असल्याने आतापासूनच लाभार्थ्यांची निवड निश्चित करावी. असे त्यांनी सांगितले. यावेळी महसुल, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, गृह विभाग, महिला व बाल कल्याण, पंचायत, आरोग्य, शिक्षण, कृषी, समाज कल्याण, पशुसंवर्धन, कामगार, कौशल्य विकास विभाग, आदिवासी विकास, महावितरण, सहकार, मत्स्य व रेशिम या विभागासह अन्य विभागांनी त्यांच्या विभागामार्फत निवडलेले आणि निवडण्यात येणाऱ्या लाभार्थ्यांची माहिती दिली.

सभेला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुहास कोरे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. अनंत खेळकर, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार, जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण) संजय जोल्हे, माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी राजेश नागपुरे, जिल्हा पशुसंवर्धन उप आयुक्त डॉ. एस.एम. कानफाडे, जिल्हा क्रीडा अधिकारी लता गुप्ता, कौशल्य विकास विभागाच्या सहायक आयुक्त सुनंदा बजाज यांचेसह सर्व यंत्रणा प्रमुख, सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसिलदार, सर्व गटविकास अधिकारी व सर्व नगर परिषदेचे मुख्याधिकारी उपस्थित होते.

### योजनांच्या लाभासाठी उत्पन्नाचा दाखला सादर करा

**वाशीम/प्रतिनिधी**

शासनाच्या विशेष सहाय्य योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करण्यात येते. यामध्ये संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन योजना या सर्व योजनांचा समावेश येतो. या योजनेचा लाभ घेणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या २० ऑगस्ट २००९ नुसार माहे एप्रिल ते जून २०२३ पर्यंत उत्पन्नाचा दाखला सादर करण्याबाबत नमुद केले आहे. त्यानुसार या योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांनी संजय गांधी योजना विभाग, तहसिल कार्यालय, वाशिम येथे विहीत कालावधीत उत्पन्नाचे दाखले स्वत: हजर राहून सादर करावे.

## नवोदय विद्यालयाचा सीबीएसई परीक्षेत १०० टक्के निकाल

**वाशीम/प्रतिनिधी**

जवाहर नवोदय विद्यालयांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३ च्या केंद्रीय माध्यमिक शिक्षा बोर्ड (सीबीएसई) परीक्षेमध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १० वी आणि इयत्ता १२ वीच्या परीक्षेत १०० टक्के निकालाची परंपरा विद्यालयाने याहीवर्षी कायम ठेवली आहे. यामध्ये इयत्ता १० वीचे ८१ पैकी ८१ आणि इयत्ता १२ वीचे ४३ पैकी ४३ विद्यार्थी प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहे. इयत्ता १२ वी विज्ञान शाखेमधून ४३ विद्यार्थी परीक्षेसाठी बसले होते. सर्व विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहे. यामध्ये प्रथम क्रमांक गौरी ढवळे ९२.८३ टक्के, द्वितीय क्रमांक आरती खडसे ९०.३३ टक्के व तृतीय क्रमांक कार्तीक जोगदंड व रोहित ओळंबे यांनी ८८.३३ टक्के गुण मिळविले आहे.

इयत्ता १० वीत प्रथम क्रमांक सुदर्शन देवकर ९८.१७ टक्के, द्वितीय क्रमांक तेजस्विनी साबळे ९७.६७ टक्के व तृतीय क्रमांक शुभव बनासकर व सुजल मगर यांनी ९३.३३ टक्के गुण मिळविले आहे. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल प्राचार्य सचिन खरात व वरिष्ठ शिक्षक एस.जी. पवार आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## तातडीने सुरु करा जलयुक्त शिवारची कामे-जिल्हाधिकारी श्री. षण्मुगराजन

**वाशीम/प्रतिनिधी**

जिल्हयात सुक्ष्म सिंचनाचा वापर वाढविण्यासोबतच पाण्याच्या ताळेबंदाच्या माध्यमातून जल साक्षरता वाढविणे गरजेचे आहे. येत्या पावसाळयात पावसाचे पाणी अडवून भूजल पातळी संरक्षित करण्यासाठी आणि विकेंद्रीत जलसाठे निर्माण करुन संरक्षित सिंचन व्यवस्था निर्माण करण्यासोबतच जलस्त्रोतांची साठवण क्षमता पुनर्स्थापित करण्यासाठी तातडीने जलयुक्त शिवार अभियानाची कामे यंत्रणांनी सुरु करावी. असे निर्देश जिल्हाधिकारी षण्मुगराजन एस. यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील वाकाटक सभागृहात जलयुक्त शिवार अभियान २.०, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार, जलशक्ती अभियान २०२३ आणि प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेचा आढावा आज़ा आयोजित सभेत घेतांना श्री. षण्मुगराजन बोलत होते. सभेला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वसुमना पंत, मृद व जलसंधारण विभागाचे जिल्हा जलसंधारण अधिकारी सुभाष आकोसकर, जिल्हा परिषदेचे जलसंधारण अधिकारी लक्ष्मण मापारी व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री. षण्मुगराजन पुढे म्हणाले, या अभियानाची अंदाजपत्रके त्वरीत तयार करावी. यंत्रणांचे आराखडे तयार असून वॉटर बजेटिंग देखील तयार आहे. ज्यांची अंदाजपत्रके तयार आहे, त्यांनी प्रशासकीय मान्यता मिळवून घ्यावी. जलयुक्त शिवार अभियानासाठी निधी हा जिल्हा नियोजन समिती व जलयुक्त निधीमधून ही कामे करण्यात यावी. यंत्रणांनी ९० टक्के कामे जलयुक्त शिवार अभियानासाठी करण्यात यावी. या अभियानाची जास्तीत जास्त यंत्रणांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात यावी. त्यामुळे या अभियानाला लोकांचा सहभाग मोठया प्रमाणात मिळण्यास मदत होणार आहे. असे ते म्हणाले.

जलशक्ती अभियानाबाबत बोलतांना श्री. षण्मुगराजन म्हणाले, या अभियानाअंतर्गत करण्यात



आलेल्या कामांचे जिओ टॅगींग फोटो संबंधित पोर्टलवर अपलोड करावीत. यंत्रणांनी आपले उद्दिष्ट निश्चित करुन आराखडा तयार करावा. सप्टेंबरपर्यंत जलशक्ती अभियानाची कामे पूर्ण करावीत. येत्या दोन दिवसात सर्व यंत्रणांनी जलशक्ती अभियानाची आराखडे मृद व जलसंधारण विभागाकडे सादर करावी. यंत्रणांनी मोठया प्रमाणात वृक्ष लागवडीची कामे हाती घेतांना वृक्ष संवर्धनाकडे देखील लक्ष दयावे. रेनवॉटर हार्वेस्टिंगची कामे करतांना शासकीय इमारतीवर तसेच शाळांवर ही कामे प्राधान्याने करावी. असे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी संबंधित यंत्रणांनी त्यांच्यामार्फत जलशक्ती अभियान २०२३, जलयुक्त शिवार अभियान २.०, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार, आणि प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना याबाबत करण्यात येत असलेल्या कामाची माहिती दिली. सभेला वाशिम उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, कारंजा उपविभागीय अधिकारी ललित व्हाडे, मंगरुळपीर उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे, सर्व गटविकास अधिकारी, सर्व उपविभागीय जलसंधारण अधिकारी, तालुका कृषी अधिकारी तसेच तालुका पातळीवर या योजनांशी संबंधित काम करणाऱ्या यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
YAVATMAL ELECTRICAL DIVISION,
PUBLIC WORKS DEPARTMENT, YAVATMAL.
**TENDER NOTICE NO. 06 FOR 2023-2024**

Online tenders in B-1 form are invited by Executive Engineer, Yavatmal (Electrical) Division, Public Works Division, Yavatmal on behalf of Governor of Maharashtra from qualified bidders for the following works under Manually Submission Tender procedure.

| Sr. No. | Name of work | Amount Put to Tender | E.M.D. |
|---|---|---|---|
| 1 | **Estimate No. 1204/EE /YTL / 2019-20:** Providing Internal Electrical Installation, External supply, Distribution system, Street lights & Water pump set to the premises of sets Mata mandir at Raveri, Tq. Ralegaon, Dist. Yavatmal. | 4504242/- | 45100/- |
| 2 | **Estimate No. 03/EE /YTL / 2023-24:** Providing Annual maintenances of Non Residential (H Type and A-3) building for premises under Elect Section-I, P.W. Sub Divison Yavatmal | 1412616/- | 14200/- |
| 3 | **Estimate No. 04/EE /YTL / 2023-24:** Providing Annual maintenances of Non Residential (A-2 & A-3 Type) building, AC units for premises under Elect Section-II, P.W. Sub Divison Yavatmal | 1471755/- | 14800/- |
| 4 | **Estimate No. 05/EE /YTL / 2023-24:** Providing Annual maintenances of Non Residential (H & A-3 Type) building, AC units for premises under Elect Pusad Section P.W. Sub Divison Yavatmal | 1125743/- | 11300/- |
| 5 | **Estimate No. 07/EE /WSM / 2023-24:** Providing Annual maintenances of Non Residential (H Type & A-3 Type) building, AC units for premises under P.W. Electrical Sub Divison Washim, Dist. Washim | 1025596/- | 10300/- |

Tender form, conditions of contract, specifications and contract drawings can be **bidder must purchase the bidding documents via online mode from www. mahatenders.gov.in** after entering the details, payment of **Rs. 590/- (Including GST) (Rupees Five Hundred Ninty Only) should be paid online using payment gateway. The fees of tender document will be non refundable.** Further information regarding the work can be obtained from the above office.

**: TENDER SCHEDULE :**

| | | |
|---|---|---|
| Cost of Tender Form | : | **Rs. 590/- (Including GST)** |
| Period of download of bidding document | : | From 15.05.2023 Time 10.00 Hours<br>To 22.05.2023 Time 18.55 Hours |
| Pre bid conference date, time and venue | | **Not Applicable** |
| Receipt of online EMD, Tender Document fees, to be paid online only via Payment Gateway mode Only. | : | Document Tender Fee and EMD to be paid via online mode only. Through bidders own account. |
| Place time and date of opening technical bids | : | Office of the Executive Engineer, P.W. (Electrical) Division, Yavatmal.<br>Date 25.05.2023 Time 11.00 to 18.55 Hours |
| Place, Time and date of opening financial bids | : | Office of the Executive Engineer, P.W. (Electrical) Division, Yavatmal.<br>Date 25.05.2023 Time 11.00 to 18.55 Hours |
| **Performance Security Deposit** | : | If the Lowest Tenderer has quoted below the Scheduled cost by more than 1%, he should submit Performance Security Deposite in the form of Bank Guarantee/Demand Draft/F.D.R. in the office of The Executive Engineer, Public Works (Electrical) Division Yavatmal within 8 days from the opening of Envelop No. 2 as per Govt. Circular No. CAT/2017/ C.No.08/Bld.-2, Dt. 26/11/2018. |
| Registration class of Contractor | : | Contractor Registered in Appropriate Class " A to B " |

Lr. No./Ex. En./(Ele.)/YTL./T.C./ 630 / 2023
Office of the Executive Engineer (Electrical) Division
Yavatmal P.W. (Electrical) Division,
P.W.D. Compound, Yavatmal.
Email : elyavatmal.ee@mahapwd.gov.in
Date : 09 / 05 / 2023.

Executive Engineer
Yavatmal Electrical Division
Public Works Division
Yavatmal